## आषाढस्य प्रथम दिवसे

आषाढाच्या पहिल्या दिवशी कालिदासाचा यक्ष आणि त्याने प्रिय पत्नीला संदेश देण्यासाठी पाठवलेला मेघदूत यांचे स्मरण झाल्यावाचून शक्य नाही. मेघाला पाहताच सामान्य माणसाच्या सुद्धा चित्तवृत्ती प्रफुल्लीत होतात. मग विरही जनांची व्यथा काय वर्णावी ?? ग्रीष्माने तापलेली धरा विरहाने व्याकुळ होवून आतुरतेने प्रियकराची वाट पहाणाऱ्या प्रियतमेप्रमाणे उष्ण निश्वास टाकीत आकाशाकडे डोळे लावून बसलेली असतांना अचानक सोसाट्याचा वारा वाहू लागतो. आकाशात ढगांची दाटी होते. जणूकाही घनमालाच त्या मालेतील पहिला गजकाय मेघ चौघड्याच्या गंभीर घोषात वसुंधरेला भेटायला येतो. प्रेमाच्या सरींची बरसात होते. आणि मृद्गंधाने सृष्टी आनंदाने जणू काही डोलू लागते.

हा जो कालिदासाचा यक्ष आहे तो प्रिय व्यक्तीच्या विरहाने व्याकुळ झालेल्या माणसाचे प्रतिनिधीत्व करतो. प्रत्येकाच्याच मनात कुठेतरी हा यक्ष लपलेला असतो. त्यामुळेच यक्षाच्या विरहदु:खाशी आपण समरस होतो.

स्वकर्तव्यात चुकलेल्या यक्षाला त्याचा स्वामी कुबेर त्याला एक वर्ष त्याच्या अलकानगरीतून हद्दपार करतो. त्यामुळे यक्ष रामगिरिच्या आश्रमात जावून राहतो. प्रियेच्या ओढीमुळे यक्षाने कुबेराच्या पुजेसाठी लागणारी फुले रात्रीच तोडून ठेवली होती. शिवपूजेच्या वेळेस फुलात अडकलेला भुंगा कुबेराच्या बोटाला चावला होता. आणि म्हणून त्याने यक्षाला शाप दिला. सर्व ऋतुमधील विरहव्यथा यक्षाने अनुभवावी म्हणून एक वर्षाचा कालावधी ठरला होता. शरदादि ऋतुंमधील विरह कांही अंशी का होईना सुसह्य होऊ शकतो; पण वर्षा ऋतु मात्र असह्य !! कारण कोसळणाऱ्या जलधारा प्रेमिकांच्या तनामनाला जाळू पहातात. जीवन देणारे हे मेघ त्यांना विषासमान वाटते. एकांतवासात असे आठ महिने

AIT Global India Pvt. Ltd.
Aspire Intend Transform

यक्षाने विरह सोसत काढले. परंतु जेव्हा आषाढाच्या पहिल्या दिवशी एक विशालकाय मेघ त्याने पाहिला, त्याला विरह दुःख सोसवेना.. तो मेघासमोर जाऊन उभा राहिला. त्याच्या लक्षात आले की हा मेघ अलकानगरीकडे जाणार आहे, मग त्याच्यासोबत प्रियेला संदेश पाठवण्याचा विचार विजेसारखा यक्षाच्या मनात चमकून जातो. मी लवकरच परत येत आहे तोपर्यंत तुझ्या कोमल शरीरात प्राण धारण करून ठेव, हा संदेश तो मेघाला देतो. अशा तो इतका विरहात बुडाला असतो की त्याला हे पण सुचत नाही की मेघ कसा काय संदेश देऊ शकेल? त्याला कुठे बोलता येतं?? पण हा सारासार विचार त्याला कसा सुचणारं!?

यक्ष जमात मुळातच सुखासीन!! दुःख त्यांना माहितीच नसते. सगळीकडे आनंदी आनंद अनुभवणाऱ्या यक्षाला एक वर्षाच्या पत्नीविरह दुःखाच्या डोंगरापुढचा वाटतो. तो मेघाला पुष्पांचे अर्घ्य देतो, प्रेमाच्या गोष्टींनी त्याचं स्वागत करतो. त्याची पत्नी घरातील उंबरठ्यावर ठेवलेली फुले मोजत मोजत विरहाचे दिवस कंठीत आहे. यक्ष मेघाला अलकानगरीचा, त्याच्या घराचा मार्ग सांगतो, वाटेत येणाऱ्या रम्य स्थळांची, तीर्थस्थानांची माहिती सांगतो. तुझा प्रवास सुखकरच होईल कारण मंद वाहणाऱ्या वाऱ्यासोबत चातकांचे कुजन तुझं मनोरंजन करतील. नद्या-पर्वत तुझे मित्र बनतील. हंस पक्षी तुला शिखरपर्यंत सोबत करतील. जात असतांना तुला रस्त्यातील प्रदेशात जलवर्षाव करावा लागेल, त्यामुळे तू रिकामा होशील म्हणून आठवणीने वेत्रवती नदीचे पाणी पी! थोडी वाट वाकडी करून उज्जयिनीचे सौंदर्य बघ! सिंधू नदी जणू कृश झालेल्या विरहिणीचे प्रतीक आहे. पुढे जाशील तेव्हा गंगायमुनेचा संगम बघशील. सायंकाळी महांकालच्या आरतीनंतर उत्तरेकडे निघालेला हा मेघ ब्रह्मावर्त, कनखल, मानसरोवर पार करून अलकानगरीत पोहचशील. आणि प्रियेला माझा हा संदेश नक्की पोहचवील!!

अशी विनवणी यक्ष मेघाला करतो!! आणि हे हे सांगण्यास

AIT Global India Pvt. Ltd.

विसरु नकोस की; जीवनात कोणालाच अत्यंत सुख किंवा दुःख मिळत नसतं. रहाटगाडग्याप्रमाणे क्रमाने खाली वर जाणारा हा सुखदुःखाचा खेळ असतो. तेव्हा डोळे मिटून चार महिने काढ". तुझे हे उपकार मी कधीच विसरणार नाही. माझ्या या सगळ्या भावना तू तिच्यापर्यंत नक्की पोहचव !!

संदेश मिळताच तिच्याही मनाला उभारी येईल. अन्यथा ती प्राणत्यागही करु शकते म्हणून कसेही करुन तिला हा संदेश पोहचवं !!

असं हे उत्कृष्ट विरहकाव्य आहे.

कालिदास जगविख्यात कवी असला तरी त्याचा काळ निश्चित सांगता येत नाही. मेघदूतामधील हा आषाढाच्या पहिल्या दिवसाच्या संदर्भ कालिदास दिनासाठी निश्चित केला आहे.

सौ विजया पुरुषोत्तम जोशी.

